**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – संदिप धोंडीराम जानकर.

**वय** – ४४ वर्ष, **हुद्दा** – जवान,

**नेमणूक**– रा. ऊ. शु. गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

**१.** मी दि.०३.०७.२०२४ रोजी मी सदर गुन्हयात रासायनिक तपासणीसाठी जप्त केलेल्या चार बाटल्यांपैकी एक गावठी दारुची आणि १ कच्या रसायनाची सिलबंद बाटल्या मुद्देमाल कारकूनाच्या ताब्यातून घेऊन दि.०४.०७.२०२४ रोजी त्या कोल्हापूरच्या प्रयोगशाळेत जमा केल्या होत्या. आता मला ते पत्र दाखवले, त्यावरती माझी स्वाक्षरी असून प्रयोगशाळेने स्विकारल्याचा शेरा आहे. त्याला **नि. क्र. पी.१२** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, मी दि.०३.०७.२०२४ रोजी सदर गुन्हयातील दोन बाटल्या रासायनिक तपासणीसाठी कोल्हापूर रासायनिक प्रयोगशाळेत जमा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०४.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – दिवाकर मधुकर वायदंडे.

**वय** – ३४ वर्ष, **हुद्दा** - दुय्यम निरीक्षक,

**नेमणूक**– रा.ऊ.शु., गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

**१.** मी दि.०२.०७.२०२४ रोजी दुय्यम उपनिरीक्षक, रा.ऊ.शु. चंदगड कार्यालय गडहिंग्लज येथे हजर असताना गुप्त बातमीदारा कडून बहिरेवाडी गावच्या पश्चिमेस, महादेव डोंगराच्या पायथ्या शेजारील ओढयाजवळ एक इसम अवैधरित्या गावठी दारुची निर्मिती करत असल्याची बातमी मिळाली होती. सदर बातमी मिळाल्यानंतर मी दोन पंचांना बोलावून पंच म्हणून येण्याची विनंती करुन इतर कर्मचा–यांसह शासकीय वाहनाने मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गेलो होतो.

२. आम्हाला तेथे एक इसम मिळून आला होता. आम्ही त्याला माहिती देऊन त्याची झडती घेतली असता, आम्हाला त्याच्या ताब्यात एक भट्टी बॅरेल, प्रत्येकी १०० लिटर रसायनाचे भरलेले दोन लोखंडी बॅरेल, ७ लिटर गावठी दारु असलेली एक प्लॅस्टीक घागर मिळून आले होते. आम्ही त्याला त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव सुनिल नाईक असल्याचे सांगितले होते. मी आरोपीच्या ताब्यातून मिळून आलेल्या रसायनातील व दारुतील प्रत्येकी १८० मिलीच्या दोन काचेच्या बाटल्यांमध्ये सिलबंद करुन त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला, त्यावरती माझी व पंचांची स्वाक्षरी असून त्याला नि. क्र.७ देण्यात आलेला आहे.

३. त्यानंतर मी आरोपीला भा. ना. सु. संहिता कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस देऊन अटक केली होती. आता मला आरोपीला दिलेली नोटीस व त्याचा अटक पंचनामा दाखवला, त्यांना अनुक्रमे **नि. क्र. पी.१३ व १४** देण्यात येतात. मी तपासा दरम्यान सदर गुन्हयातील रासायनिक तपासणीसाठी वेगळया केलेल्या मुद्देमालातील दोन बाटल्या जवान जानकर यांच्या मार्फत प्रयोगशाळेत जमा केल्या होत्या. आता मला त्याबाबत मी जानकरांना दिलेले पत्र दाखवले. त्याला नि. क्र. पी.१२ देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे सदर

प्रकरणातील रासायनिक तपासणीचा अहवाल प्राप्त झाला असून तो मी दोषारोप पत्रासोबत दाखल केला आहे. आता मला तो अहवाल दाखवला, त्याला **नि. क्र. पी.१५** देण्यात येतो. मला तपासाअंती आरोपीने हातभट्टी दारुची निर्मिती केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी दोषारोपपत्र दाखल केले आहे. आम्ही घटनास्थळावरुन रसायनाचा नमुना काढल्यानंतर इतर मुद्देमालाचा नाश केला होता. आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेली दारु मालखान्यात जमा आहे. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी दि.०२.०७.२०२४ रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती प्रमाणे कारवाई करण्यासाठी गेल्याचे खोटे सांगत आहे. मला आम्ही कारवाई केलेली जागा शासकीय ओढयाची असल्यामुळे तिचा मिळकत क्रमांक सांगता येणार नाही. मला ती जागा शासकीय असल्याबाबत निश्चित सांगता येणार नाही. मी सोबत नेलेल्या पंचांनी पुर्वी काही प्रकरणांमध्ये काम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला घटनास्थळी रसायनाचे बॅरेल व दारुचे ड्रम मिळून आल्याचे मी खोटे सांगत आहे. मी आरोपीच्या ताब्यातून मिळून आलेल्या रसायन व दारु मधून रासायनिक तपासणीसाठी नमुना घेतलेल्या बाटल्यांमध्ये संप्रेरके घातलेली नव्हते.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, रासायनिक तपासणीकामी वेगळया केलेल्या बाटल्यांतील प्रत्येकी रसायनाची व दारुची एक बाटली जानकर मार्फत तपासणीसाठी पाठवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासामध्ये आरोपीने हातभट्टी दारुची निर्मिती केल्याचे आढळून आले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्हयातील कारवाईचे खोटे पंचनामे कार्यालयात बसून तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही पुरावा नसताना आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**                **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०४.२०२६.                (आर. पी. थोरे)

आजरा.                प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.